॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. ५ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेतील प्रा.मनिष जोशी यांना भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

भाषांतराच्या माध्यमातून विज्ञान व तंत्रज्ञान लोकप्रिय होण्यासाठी डॉ.जोशी यांनी जे प्रयत्न केलेत त्याबद्दल हा पुरस्कार घोषित करण्यात आला. डॉ.जोशी हे १९९७ पासून विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेत कार्यरत असून त्यांनी कॅनडा येथून पोस्ट डॉक्टरेट फेलोशिप पूर्ण केली आहे. झांबिया, दक्षिण आफ्रिका येथेही त्यांनी अभ्यासदौरा केलेला आहे. डॉ.जोशी यांचे १०० पेक्षा अधिक शोधनिबंध प्रसिध्द झालेले असून वेगवेगळे संशोधन प्रकल्प देखील त्यांनी पूर्ण केले आहेत. गिम्प या सॉफ्टवेअरचे मराठी करणाच्या प्रकल्पामुळे तंत्रज्ञान प्रेमी नवीन युवापिढीला या वापरातून प्रतिमा संपादनाविषयीच्या मराठी संज्ञा व मराठी संकल्पना स्पष्ट होतील व आत्मसात देखील होतील. प्रादेशिक भाषांचा वापर केवळ बोलीभाषा म्हणूनच होतो, त्या ज्ञानभाषा होऊ शकत नाही या प्रवादाला या प्रकल्पातून योग्य तो संदेश जाणार आहे. या मराठीकरणाच्या सॉफ्टवेअरचा वापर करुन विद्यापीठाने प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे यशस्वी आयोजन केले. डॉ.जोशी यांचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर तसेच मंगळवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सर्व सदस्यांनी अभिनंदन केले.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि. ५ ( ) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा संशोधन केंद्रात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमधील लेखन कौशल्य विकसित व्हावे या उद्देशाने `साहित्य सृजन` या भित्तीपत्रिकेचे विमोचन करण्यात आले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक श्री.बी.पी.पाटील यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा.म.सु.पगारे अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना बी.पी.पाटील म्हणाले की, असे उपक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे व दिशा देणारे असतात.

अध्यक्षीय मनोगतात प्रा.म.सु.पगारे यांनी हे उपक्रम कशा प्रकारे विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरतात हे पटवून दिले तसेच भित्तीपत्रिकेच्या मागील अंकाचा आढावा घेतला. ते म्हणाले की, प्रत्येक वेळेला नवनवीन विषय घेवून विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देण्याचे काम प्रशाळा सतत करते. या कार्यक्रमासाठी इंग्रजीच्या विभागप्रमुख प्रा.मुक्ता महाजन, हिंदी विभागप्रमुख डॉ.सुनील कुलकर्णी, सहयोगी प्राध्यापक आशुतोष पाटील व प्रशाळेतील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुनील अहिरे यांनी केले तर आभार मीना वसावे हिने मानले.

---

**बातमी क्र.३**

जळगाव दि. ५ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बी.ए. इतिहास परीक्षेत विद्यापीठातून सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस ` श्री.गणेश लक्ष्मण पूर्णपात्री सुवर्णपदक, भडगाव` प्रदान करण्यासाठी श्री.गणेश लक्ष्मण पूर्णपात्री यांनी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्याकडे दोन लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला.

यावर्षापासून श्री.गणेश पूर्णपात्री यांनी हे सुवर्णपदक प्रायोजित केले असून बी.ए परीक्षेत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला ` श्री.गणेश लक्ष्मण पूर्णपात्री ` यांच्या नावे सुवर्णपदक दिले जाणार आहे. धनादेश सुपूर्द करताना सौ.जयश्री पूर्णपात्री, श्री.विजय देशपांडे, डॉ.दीपक मराठे, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील हे उपस्थित होते.

---

जा.क्रः कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ५ फेब्रुवारी, २०१९

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ. सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी